अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

वर्ष : २४ वे | अंक : १२६ वा | किंमत : ५ रुपये | पाने १२

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ ।

## एकत्रीकरणाची वात टिचभर! 'इंडिया' आघाडी गॅसवर




मुंबई/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ) कडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसताना आणि भाजपच्या केंद्रीय नेत्यांचा एकत्री करणाला असणारा विरोध समोर आला असताना महाराष्ट्रात मात्र पुनःपुन्हा एकत्री करणाची वात पेटवली जात आहे या टिचभर वातीच्या धगीने इंडिया आघाडी मात्र सध्या गॅसवर आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. विलीनीकरणाच्या चर्चेपासून शरद पवारांनी स्वतःला दूर ठेवले असले तरी विलीनीकरण झाल्यास शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी सरकारमध्ये सामील होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशात इंडिया आघाडीतील नेत्यांनीही विलीनीकरणावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. विलीनीकरण झाल्यास शरद पवार गट इंडिया आघाडीतून बाहेर पडणार का? असाही प्रश्न निर्माण होत आहे. राज्यात दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाच्या विषयावर पेटलेली वात शमताना दिसत नाही. दावे-प्रतिदावे यातून राजकारण पेटले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या माहोलतच विलीनीकरणावरुन उठलेली राळ खाली बसताना दिसत नाही. सोमवारी विलीनीकरणाच्या विषयावरुन दोन्ही राष्ट्रवादीमधील नेतेमंडळींमध्ये खेचाखेची पाहायला मिळाली.

### शिवसेनेतील नेत्यांचे म्हणणे काय?



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी एका वृत्तसंस्थेला सांगितले की, ही अशा चर्चांची वेळ नाही. ते सध्या दुःखात आहेत. हा पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे आणि या क्षणी बोलण्यासारखे काय आहे? शिवसेनेच्या दुसऱ्या एका वरिष्ठ नेत्याने राऊत यांच्या विधानाचे समर्थन करत म्हटले, काही दिवसांपूर्वीच कुटुंबात मृत्यू झाला आहे. कुटुंब अजूनही दुःखात असताना राजकीय चर्चा करणे मला योग्य वाटत नाही.

### शरद पवार गट इंडिया आघाडीतून बाहेर पडल्यास काय?

दिल्लीतील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या (एआयसीसी) एका वरिष्ठ नेत्याने यावर बोलताना प्रश्न केला आणि म्हटले की, यात आम्ही काय करू शकतो? दोन्ही गट आणि पवार कुटुंबालाच याबाबत निर्णय घ्यावा लागेल. कुटुंबातील एका वरिष्ठ सदस्याचे निधन झाले आहे, त्यामुळे आम्ही सध्या या विषयात ढवळाढवळ करू इच्छित नाही. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि जशी परिस्थिती बदलेल तसे पाऊल उचलू.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाचे धक्कादायक वृत्त येण्यापूर्वी ८ फेब्रुवारीलाच राष्ट्रवादीचे दोन्ही गट विलीनीकरणाची घोषणा करणार होते. भारतीय काँग्रेस कमिटीच्या नेत्याने असेही म्हटले की, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) 'इंडिया' आघाडीतून बाहेर पडणे हा मोठा फटका नसेल. एखाद्याच्या जाण्याचा युतीवर सकारात्मक परिणामही होऊ शकतो. राजकारण इतके गतिमान आहे की आधीच अंदाज वर्तवणे कठीण आहे, असे त्यांनी नमूद केले.महाराष्ट्रातील एका काँग्रेस खासदाराने सांगितले की, जर शरद पवार आणि त्यांचा पक्ष विरोधी आघाडी सोडत असेल तर ते मोठे नुकसानदायी



ठरेल. शरद पवार)हे महाराष्ट्रात विरोधी ऐक्याचे मुख्य सूत्रधार होते. त्यांनी २०१९ मध्ये काँग्रेस आणि शिवसेना (फुटीनंतरची शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्याबरोबर महाविकास आघाडी स्थापन करण्यात मदत केली होती.सुप्रिया सुळे संसदेत उत्तम वक्त्या आहेत आणि दिल्लीसह महाराष्ट्रात त्यांचा मोठा आदर आहे. शरद पवारांबद्दल मी काय बोलणार? त्यांचे राजकीय स्थान कदाचित थोडे कमी झाले असेल, तरीही ते एक दिग्गज नेते आहेत आणि ते ज्या युतीमध्ये किंवा पक्षात असतील, ती त्यांची मोठी संपत्ती असेल. त्यांनी साथ सोडली तर ते विरोधकांसाठी मोठे नुकसान असेल, पण सध्यातरी आम्ही फार काही करू शकत नाही, असे महाराष्ट्रातील एका खासदाराने सांगितले.राज्यातील काँग्रेसच्या आणखी एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, पक्षाने अद्याप पवार कुटुंबाशी कोणताही संपर्क साधलेला नाही. राज्य युनिटमध्ये आम्ही आधीच ठरवले आहे की, पवार कुटुंबाशी आता बोलण्यात काही अर्थ नाही. ते काय निर्णय घेतात आणि काय करतात ते पाहूया आणि त्यानुसार आगामी काळात पावले उचलली जातील. विलीनीकरणाची माहिती अद्याप कोणालाही नाही.

### दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर भुजबळांनी मौन सोडले

बैठकीमध्ये काय काय ठरलं होतं? सगळं सांगितलं



मुंबई : दरम्यान दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणासंदर्भात वेगवेगळे दावे सुरू असतानाच आता भुजबळ यांनी यासंदर्भात बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. प्रत्येक जण आपआपल्या पद्धतीने सांगत आहे, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

**नेमकं काय म्हणाले भुजबळ?**

दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येण्यासंदर्भात एक बैठक झाली होती, त्याचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला होता. त्या प्रश्नाला उत्तर देताना भुजबळ यांनी मोठं विधान केलं आहे.

भूजबळ म्हणाले, आता असंही आहे, प्रत्येकजण आपआपल्या पद्धतीने माहिती सांगतो, त्याला पुरावा काय? हे काही माहिती नाही. मला फक्त एवढं माहिती होतं, बारामतीमध्ये कृषी प्रदर्शन होतं, त्यावेळी ही सर्व मंडळी तिथे एकत्रीत आली होती, आणि त्यावेळी जिल्हा परिषदेच्या ज्या निवडणुका आहेत, त्या एकत्रित लढाव्यात, अशा प्रकारचं ठरलेलं होतं, हे मला अजित पवार यांनी सांगितलं होतं. त्या पलिकडे काहीही ठरलं नाही. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे, जर तसं काही असतं तर अजितदादा यांनी मला तसं सांगितलं असतं, माझ्याशी शेअर केलं असतं, असं फडणवीस म्हणाले, असं यावेळी भुजबळांनी सांगितलं.

#### शरद पवार यांचा पक्ष एनडीएत सहभागी होणार होता?

दरम्यान, सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार होते असे म्हटले जात आहे. तसेच जयंत पाटील आणि रोहित पवार यांनादेखील मंत्रिपद दिले जाणार होते असे सांगितले जात असेल तर शरद पवार यांचा पक्ष एनडीएत सहभागी होणार होता का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळेच आता शरद पवार यावर नेमके काय स्पष्टीकरण देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना शरद पवार यांनी असं म्हटलं होतं की, जे या बैठकीला नव्हते, त्यांना काय माहिती, असाही प्रश्न यावेळी भुजबळ यांना विचारण्यात आला, याला देखील भुजबळ यांनी उत्तर दिलं आहे. ही सर्वमंडळी कृषी प्रदर्शनासाठी एकत्र आली होती, त्यामुळे आम्ही तिथे असण्याचं काही कारणच नाही. अजितदादा हे बारामतीचे असल्यामुळे या कृषी प्रदर्शनामध्ये होते, अचानक तिकडे अशी काही मिटिंग होणार आहे, हेही कोणाला माहिती नव्हतं. आणि जर असं काही घडणार असतं तर तिकडचे दहा -पंधरा माणसं, इकडचे चार -पाच माणसं सोबत असताना बैठक घ्यायला पाहिजे होती, मला वाटतं आता या सगळ्या संदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार याच निर्णय घेतील, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

### आम्हीही अनुभवी, काम केलंय, तटकरेंचे सूचक विधान अन् विलीनीकरणाला आडकाठी



दरम्यान, एकीकडे अजित पवारांच्या निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची पोकळी निर्माण झाल्याची चर्चा असतानाच सुनील तटकरेंनी केलेल्या एका विधानाची चर्चा सुरू झाली आहे. आम्ही स्वतंत्ररीत्या निवडणूक लढलो. जिंकून आलो. विलिनीकरणाबाबत निर्णय चर्चा सुरू होईल तेव्हा होईल. आमचं याहून वेगळं मत असण्याचं कारण नाही. आम्हीही दीर्घकाळ अजित पवारांसोबत राहून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं नव्याने घेतलेली भूमिका महाराष्ट्रात अंमलात आणण्यासाठी आम्हीही मेहनत घेतली आहे. आम्हीही दीर्घकाळ काम केलेलं आहे. २०१४ सालात मलाही शरद पवारांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून नेमलेलं होतं. त्यामुळे आम्ही अननुभवी आहोत असं काही नाही, असं ते म्हणाले आहेत. त्यामुळे आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेमकी कोणती भूमिका घेणार? यावर सध्या जोरदार तर्क-वितर्क सुरू झाले आहेत.

#### इतर पक्षांची भूमिका

इंडिया आघाडीचा घटक असलेल्या समाजवादी पक्षाच्या एका राज्यसभा खासदाराने सांगितले की, आघाडी किंवा काँग्रेस सध्या काहीही करू शकत नाही. एखाद्या मित्रपक्षाशी काही राग किंवा नाराजी असती, तर आम्ही त्यांच्याशी बोलू शकलो असतो, पण तसे नाहीये. तिथे जे घडत आहे ते त्यांचे अंतर्गत प्रश्न आहेत. दोन कुटुंबे आणि दोन गट एकत्र येण्याचा इंडिया आघाडीशी काहीही संबंध नाही, मग आम्ही त्यांच्याशी चर्चा कशी सुरू करू शकतो?

#### राष्ट्रवादीच्या एका गटाला नको आहे विलीनीकरण

मात्र, सध्या शरद पवारांच्या वक्तव्यावरून ही प्रक्रिया थांबल्याचे दिसत आहे. मुख्य म्हणजे, महत्त्वाचे निर्णय आता त्यांच्या गटाला विश्वासात न घेताच घेतले जात असल्याने कुठेतरी त्यांची नाराजी असल्याचे चित्र आहे. सुनेत्रा पवार यांची विधीमंडळ पक्षनेतेपदी झालेली निवड ही अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीची अंतर्गत बाब असून त्याबाबत आपल्या गटाशी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे पवारांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या टिप्पणीमुळे सत्ताधारी राष्ट्रवादीत विलीनीकरणाबाबत असलेला विरोध उघड झाला आहे. राष्ट्रवादीतील एका गटाला विलीनीकरण नको आहे, कारण त्यांना स्वतःचे अधिकार, सरकारमधील स्थान आणि पक्षावरील नियंत्रण गमावण्याची भीती आहे; त्यामुळे पुढे काय निर्णय होतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.


#### पक्षाच्या अंतर्गत बाबीचा आघाडीशी संबंध काय?

मोठ्या आघाडीत कोणत्याही पक्षाला पूर्ण स्वायत्तता असते. एखादा पक्ष अंतर्गत काय करतो, याचा आघाडीशी संबंध नसतो. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) कडे ८ लोकसभा आणि २ राज्यसभा खासदार आहेत. जर विलीनीकरण झाले, तर संयुक्त पक्षाकडे ९ लोकसभा खासदार आणि उच्च सभागृहात (राज्यसभा) ५ सदस्य असतील, ज्यामुळे संसदेत एनडीएचे संख्याबळ वाढेल.

## मालक म्हणाले, हा फाटका कार्यकर्ता तो म्हणाला, मी 'फाटका' नाही 'नेटका'

मोहोळ/प्रतिनिधी

जकराया शुगर्सचे सर्वेसर्वा आणि जिल्हा परिषदेच्या कुरुल गटाचे भाजपाचे उमेदवार सचिन जाधव यांनी चार चौघात एका समर्थकाचा उल्लेख हा माझा फाटका कार्यकर्ता ' असा करताच संतापलेल्या त्या स्वाभिमानी समर्थकाने मी फाटका नाही तर नेटका कार्यकर्ता असल्याचे सुनावल्याची चर्चा सोमवारी दिवसभर मोहोळ तालुक्यात रंगली.




कुरुल जिल्हा परिषद गटामध्ये शेवटच्या टप्प्यातील प्रचाराची रणधुमाळी सांगलीत सुरू आहे यामध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फायरी एकमेकांवर पडत असताना भाजपाचे कुरुल गटातील जिल्हा परिषदेचे उमेदवार सचिन जाधव यांच्याकडून सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा अपमान झाल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला आणि एकच खळबळ उडाली .

मोहोळ तालुक्यातील सहा जिल्हा परिषद गटातील सर्वात हाय व्होल्टेज लढत कुरुल जिल्हा परिषद गटात सुरू असून दोन्ही उमेदवार एकमेकांच्या विरोधात प्रचाराच्या तोफा उडवत आहेत .मतदारांबरोबरच कार्यकर्त्यांनाही आपलंसं करण्यासाठी भाजपाचे जुने जाणकार कार्यकर्ते सर्वसामान्यांना गोंजारत आपलंसं करण्याचा प्रयत्न करत आहेत तर दुसरीकडे ज्यांच्यासाठी खाटाटोप सुरू आहे तेच उमेदवार प्रसारमाध्यमांसमोर कार्यकर्त्यांना तुसडे पणाची भावना दाखवत आहेत त्यामुळे अवघ्या चार दिवसांवर आलेल्या निवडणुकीत कार्यकर्ते भाजपासोबत राहणार का ? असा या निमित्ताने प्रश्न उपस्थित केला जात आहे .

कुरुल जिल्हा परिषद गटाचे भाजपाचे उमेदवार सचिन जाधव प्रसारमाध्यमांसमोर निवडणुकीची भूमिका स्पष्ट करत असताना त्या ठिकाणी उभ्या असलेल्या कार्यकर्त्याला त्यांनी बोलत बोलत हा माझा फाटका कार्यकर्ता असल्याचे म्हणतात तो कार्यकर्ता चांगला चिडला व मी फटका नाही तर नेटका आहे अशा शब्दात सुनावल्याने एकीकडे विरोधी उमेदवार हात जोडून विनंती करून मते मागत असल्याचे चित्र आहे तर दुसरीकडे मात्र चक्क उमेदवारच कार्यकर्ता आणि मतदाराला फटका असल्याचे प्रसारमाध्यमांसमोर जगजाहीर सांगत असल्याचे चित्र पाहायला मिळाले यामुळे मात्र कुरुल जिल्हा परिषद गटातील सर्वसामान्य मतदारांमध्ये तीव्र भावना व्यक्त केल्या जात आहेत .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




मी पहिल्यांदा सगळ्यांना लहानच वाटतो...

कल्याण
379-91-489

मुंबई
379-97-340

## महत्वाची पदे 'मध्य' आणि 'दक्षिण'कडे; आता स्थायी समिती सभापतीपद 'उत्तर'कडे?

सोलापूर/प्रतिनिधी

महापौर, उपमहापौर आणि गटनेता ही तीन महत्त्वाची पदांची घोषणा भाजपकडून झाली आहे. त्यामुळे आता स्थायी समिती सभापतीच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापौर, उपमहापौर आणि गटनेतापद शहर मध्य व दक्षिण मतदारसंघात गेल्यानंतर आता शहर उत्तर मतदारसंघाचा नंबर लागणार का, स्थायी समितीचे नेतृत्व शहर उत्तरकडे जाणार का, याबाबत महापालिका वर्तुळात जोरदार चर्चा रंगू लागली आहे.



सोलापूर महापालिकेच्या सत्ताकारणात अलीकडेच महत्त्वाच्या पदांची निवड पूर्ण झाली. सोमवारी महापौरपदी विनायक कोंड्याल, तर उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर यांची नावे जाहीर करण्यात आली. त्याआधी दोन दिवसांपूर्वी गटनेता म्हणून नरेंद्र काळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. या तिन्ही नियुक्त्यांमुळे शहरातील राजकीय समीकरणे नव्याने आकार घेताना दिसत आहेत.

विनायक कोंड्याल हे शहर मध्य मतदारसंघातील नगरसेवक असून ते आमदार कोठे यांचे समर्थक आहेत. ज्ञानेश्वरी देवकर या शहर दक्षिण मतदारसंघातून निवडून आल्या असून त्यांना आमदार सुभाष देशमुख यांचे पाठबळ आहे. गटनेता नरेंद्र काळे यांचे नाव पक्षातून थेट पुढे आले असले आणि ते कट्टर सुभाष देशमुख विरोधक असले तरी ते दक्षिण मतदारसंघातून निवडून आले आहेत. यामुळे महत्त्वाची तिन्ही पदे मध्य आणि दक्षिण मतदारसंघात गेल्याने शहर उत्तर मतदारसंघाला आणि खास करून आ. विजयकुमार देशमुख यांच्या समर्थकांना संधी मिळणार का याची चर्चा सुरू झाली आहे.

आगामी काळात स्थायी समितीच्या निवडी होणार आहेत. त्यात सभापती हे पद अत्यंत प्रभावी मानले जाते. आर्थिक निर्णय, विकासकामे आणि निधी वाटपावर या पदाचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे या पदासाठी मोठी चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. महत्त्वाची पदे आधीच मध्य व दक्षिण मतदारसंघात गेल्याने स्थायी समितीचे सभापतीपद शहर उत्तरकडे, पर्यायाने आमदार विजयकुमार देशमुख यांच्या समर्थकांकडे जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापूरच्या राजकीय वर्तुळात या मुद्द्यावर जोरदार चर्चा सुरू आहे.